# पंचगंगा नदीच्या प्रदूषणाबाबतची टिप्पणी दिनांक २०/०७/२०१०

१. कोल्हापूर जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ ७६८५ चौकिमी असून जिल्हयाची लोकसंख्या ३५२३१६२ इतकी आहे. या जिल्हयात १२ तालुके, ९ नगरपरिषदा व कोल्हापूर महानगरपालिकाचा समावेश आहे. या जिल्हयात जवळपास १२०० लहान मोठी खेडी आहेत.

कोल्हापूर जिल्हयातील कुंभी, कासारी, तुलसी, धामणी आणि भोगावती या नद्या सहयाद्री पर्वतातून उगम पावतात. प्रयाग चिखली जि. कोल्हापूर येथे या उपनद्यांचा संगम होवून पंचगंगा नदी होते. नृसिंहवाडी येथे पंचगंगा नदी कृष्णेस मिळते. या नदीची अंदाजे लांबी १२५ किमी. आहे व नदीचे संपूर्ण पाणलोट क्षेत्र कोल्हापूर जिल्हयात आहे. या नदीच्या काठी वसलेले कोल्हापूर, इचलकरंजी ही शहरे, तसेच जिल्हयातील १७४ ग्रामपंचायती कमी अधिक प्रमाणात यांचे घरगुती सांडपाणी, साखर कारखाने, औद्योगिक वसाहती या मधून निर्माण होणारे सांडपाणी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रित्या पंचगंगा नदीत मिसळत असल्यामुळे नदीच्या पाण्याची गुणवत्ता दिवसेंदिवस खालावत असल्याचे दिसून येते.

पंचगंगा नदीच्या उगमापासून ती कृष्णा नदीस मिळेपर्यंत तीच्या खो-यामध्ये वसलेले विविध उद्योग, कोल्हापूर महानगरपालिका, इचलकरंजी नगरपालिका, १७४ ग्रामपंचायती कमी अधिक प्रमाणात पंचगंगा नदीच्या प्रदूषणास जबाबदार आहेत. या घटकामधूना खालिल प्रमाणे साधारणतः सांडपाण्याची निर्मीती होते -

| | | | |
|---|---|---|---|
| ➔ | कोल्हापूर महानगरपालिका | .. | ९० एमएलडी |
| ➔ | इचलकरंजी नगरपालिका | .. | ४० एमएलडी |
| ➔ | ३१७४ ग्रामपंचायती | .. | २३ एमएलडी |
| ➔ | विविध उद्योग | .. | १८ एमएलडी |
| | | एकूण | १७१ एमएलडी |

वर नमुद केलेल्या सांडपाण्यावर संबंधीत घटकाने जल प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ अन्वये योग्य ती प्रक्रिया करून ते शेती व बागबगीच्या साठी वापरुन उर्वरित प्रक्रिया युक्त सांडपाणी घालून दिलेल्या मानांकाच्या अधिन राहून नदीत सोडणे अपेक्षीत आहे. तथापी, कोल्हापूर महानगरपालिका, इचलकरंजी नगरपरिषद आणि नदी खो-यामध्ये वसलेल्या १७४ ग्रामपंचायती मधून निर्माण होणा-या बहुतांशी सांडपाण्यावर योग्य ती प्रक्रिया न करता पंचगंगा नदीत सोडले जाते. वर नमुद केलेल्या घटकामधून एकूण १७१ एमएलडी सांडपाणी निर्माण होते पैकी १५३ एमएलडी म्हणजेच जवळ जवळ ९० टक्के सांडपाणी हे कोल्हापूर

महानगरपालिका, इचलकरंजी नगरपरिषद व १७४ ग्रामपंचायती यांच्यामार्फत निर्माण होते. या शिवाय या १० टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी जवळ जवळ सर्व उद्योगानी स्वतःच्या औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारल्या आहेत.

पंचगंगा नदीची मंडळातर्फे एकूण पाच ठिकाणी पाण्याची गुणवत्ता तपासण्यात येते. जसे बालींगा नदी कोल्हापूर शहराच्या वरचे बाजूस, पंचगंगा नदी राष्टीय महामार्ग ४ च्या पुलाखाली कोल्हापूर शहराच्या खालच्याबाजूस, इचलकरंजी घाट, शिरोळी, शिरोळ. पंचगंगा नदी काळम्मावाडी धरणापासून कृष्णा नदीत मिसळूपर्यंत नदी वर्गीकरण नियमानुसार (RRZ policy) अ २ वर्गीकृत करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे सदरील नदीच्या पात्रातून नियमितपणे पाण्याचे नमुने गोळा करुन पृथ्थकरण केले जाते. पृथ्थकरण अहवाल सोबत जोडलेला आहे. पृथ्थकरण अहवालावरुन असे निदर्शनास येते की, नदीच्या पाण्याची गुणवत्ता अ २ प्रवर्गाप्रमाणे आहे. अ २ वर्गात मोडणा-या पाण्याचा उपयोग पिण्यासाठी करावयाचा असल्यास त्याला योग्य ती प्रक्रिया करुनच वापरणे गरजेचे आहे.

**२. जल प्रदूषणासाठी कारणीभूत असणारी नागरी क्षेत्रातील घटकांची माहिती खालील प्रमाणे आहे.**

कोल्हापूर शहराची २००१ च्या जनगणनेनुसार ४,८४,१०१ एवढी लोकसंख्या असून या शहराला १२० दशलक्ष लिटर्स प्रतिदिन एवढा पाणी पुरवठा बालिंगा, कळंबा, कसबा बावडा व पुईखडी शिंगणापूर या जलपुरवठा योजनेतून सध्या होत आहे.

कोल्हापूर शहरास पुरविण्यात येणा-या उपरोक्त क्षमतेच्या पाणी पुरवठयातून अंदाजे ९० दशलक्ष लिटर्स प्रतिदिन एवढया सांडपाण्याची निर्मिती होते. कोल्हापूर शहरासाठी अस्तित्वात असलेली भुयारी गटारी योजना ३० वर्षे जुनी असून या योजनेची क्षमता केवळ २५ दशलक्ष लिटर्स प्रतिदिन एवढी आहे. ही योजना तयार करताना कोल्हापूर शहराची २.५ लाख लोकसंख्या गृहीत धरली होती. १९७६ साली कसबा बावडा या कोल्हापूर शहराच्या भागात ४३-५ दशलक्ष क्षमतेची सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा बसविलेली आहे. या प्रक्रिया केंद्रामध्ये स्क्रीन चेंबर्स व स्लज डाईंग बेडस अशा प्रकारची प्राथमिक स्वरूपाची प्रक्रिया संयंत्रणा असून या योजनेतील स्लज डायजेस्टर हा भाग गेल्या काही वर्षापासून कार्यरत नाही. कोल्हापूर महानगरपालिकेव्दारे दुधाळी नाल्यावर गणपती घाटाजवळ बंधारा बांधून तेथील पाणी पंपाव्दारे जयंती नाल्यात दसरा चौक येथे सोडले जाते. परंतु, सदरील बंधा-याची उंची अपुरी असल्यामुळे व पंपाची क्षमता कमी व अनियमित विज पुरवठा यामुळे दुधाळी नाल्यातील पाणी सतत बंधा-यावरुन पंचगंगा नदीत मिसळते. जयंती नाल्यावर दसरा चौक येथे बंधारा बांधलेला असून त्यामध्ये सदरील नाल्याचे सांडपाणी व दुधाळी नाल्यातून आलेले सांडपाणी पंपाव्दारे कसबा बावडा येथील प्रक्रिया सयंत्रणेकडे पाठवले जाते. परंतु, दर पावसाळयात दुधाळी व जयंती नाल्यावरील बंधा-याला लावलेले बरगे काढले जातात व

संपूर्ण पावसाळयात सदरील सांडपाणी कुठल्याही प्रक्रियेविना पंचगंगा नदीत मिसळते. पावसाळया व्यतिरिक्त काळात जयंती नाल्यातून उपसा केलेल्या सांडपाण्यावर कसबा बावडा येथील सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेत अंशतः प्रक्रिया करण्यात येत असून उरलेले ४६.५ दशलक्ष लिटर्स एवढे सांडपाणी कोणत्याही प्रक्रियविना पंचगंगा नदीत कोल्हापूर शहरातील विविध नाल्याव्दारे पंचगंगा नदीत मिसळते.

कोल्हापूर शहरातून निर्माण होणारे घरगुती सांडपाणी विविध नाल्याव्दारे पंचगंगा नदीत अंशतः प्रक्रिया करुन किंवा प्रक्रियेविना सोडल्यामुळे कोल्हापूर शहराच्या खालिल बाजूस व इतर ज्या गावांना पंचगंगा नदीतून पाणी पुरवठा आहे त्यांना दुषीत पाणी पुरवठा होत असल्या बाबतच्या तक्रारी या मंडळाच्या कोल्हापूर येथील कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत. त्या अनुषंगाने पंचगंगा नदीच्या प्रदूषणाचा विचार करता कोल्हापूर महानगरपालिकेने शहरातून निर्माण होणा-या सांडपाण्यावर योग्य ती प्रक्रिया संयंत्रना बसविलेली नसल्यामुळे

i. कोल्हापूर महानगरपालिकेस १३१ वेळा नोटीसा दिलेल्या आहेत.

ii. महानगरपालिकेचे पंचगंगा नदी प्रदूषणास जबाबदार असणा-या तत्कालीन आयुक्त, जलअभियंता, शहर अभियंता इ. विरोधात जिल्हा न्यायालयात ३ फौजदारी खटले दाखल केलेले आहेत.

iii . कोल्हापूर महानगरपालिकेने विहित वेळेत सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा न उभारल्यामुळे प्रथमतः १ लाख रूपये व दुस-यांदा २ लाख रूपयांची बँक हमी जप्त केलेली आहे.

मंडळाने कोल्हापूर महाागरपालिकेस सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी योग्य ती सयंत्रणा न उभारल्यामुळे २ वेळा तिच्या कार्यालयाचा विद्युत पुरवठा खंडीत केलेला आहे.

वरील परिस्थीतीचा विचार करून कोल्हापूर महानगरपालिकेने राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेअंतर्गत सुधारीत ७५.०९ कोटीचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडे पाठविण्यात आला होता. त्यास केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाने मंजूरी देवून सांडपाणी प्रक्रिया संयंत्रना उभारण्यास रूपये ७४.२९ कोटीचा निधी मंजूर केला आहे. त्यापैकी ७.३८ कोटीचा निधी कोल्हापूर महानगरपालिकेस प्राप्त झालेला असून महानगरपालिकेकडून या कामाच्या निविदा तयार करण्याचे काम सुरू आहे.

**ब. <u>नागरी घनकचरा</u> -**

कोल्हापूर शहरातून एकूण १६५ मेट्रीक टन प्रतिदिन नागरी घनकचरा निर्माण होत असून त्यावर प्रक्रिया करण्यासाठी महानगरपालिकेतर्फे प्रायोगीत तत्वावर मे. झुम बायोफर्टीलायझर्स प्रा. लि. यांना सर्वे नं. ८४२, आर.एस. नं. २०६, लाईन बजार, कसबा बावडा, कोल्हापूर याठिकाणी नागरी घनकच-यातील विघटीत होणा-या घनकच-यावर

प्रक्रिया करुन त्यापासून जैविक खत निर्माण केले जाते. परंतु सदरील प्रकल्प हा सद्यस्थितीत निर्माण होणा-या नागरी घनकच-यासाठी अपु-या क्षमतेचा आहे तसेच प्रक्रिया केल्यानंतर विघटीत न होणा-या घटकाची विल्हेवाट शास्त्रीय पध्दतीने करण्यासाठी महानगरपालिकेकडे जागा उपलब्ध नसल्यामुळे सदरील कचरा हा महानगरपालिकेमार्फत शहरातील विविध ठिकाणी व पंचगंगा नदीच्या पात्रात टाकला जात असल्या बाबतच्या तक्रारी मंडळाच्या कोल्हापूर येथील कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत. यासाठी मंडळाने महानगरपालिकेकडे सातत्याने पाठपुरावा करून कसबा बावडा येथे अपु-या पडत असलेल्या जागेचा विचार करून नवीन जागा निश्चीत करण्यासाठी निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी कोल्हापूर शहराच्या जवळील टोप या गावाच्या ग्रामपंचायतीच्या हददीत नागरी घनकचरा विल्हेवाटीसाठी जागा दिलेली आहे. परंतु सदर जागेस ग्रामस्थांचा विरोध आहे व त्यांनी न्यायालयात खटला दाखल केलेला असून सद्यस्थितीत जिल्हाधिकारी यांनी सदरील जागा कोल्हापूर महानगरपालिकेला हस्तांतरीत केलेली आहे.

३. **<u>इचलकरंजी नगरपालिका</u> -**

इचलकरंजी शहरातून एकूण ३८ एमएलडी सांडपाण्याची निर्मीती होते. त्यापैकी २० एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी नगरपालिकेने प्राथमिक व दुय्यम स्वरुपाची प्रक्रिया करणारी संयंत्रणा उभारलेली आहे. परंतु, या प्रक्रिया यंत्रणेमध्ये फक्त १२ एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते व उर्वरीत २६ एमएलडी सांडपाणी हे कोणत्याही प्रक्रियेविना विविध नाल्याव्दारे पंचगंगा नदीत मिसळत असते.

मंडळाने आतापर्यंत इचलकरंजी नगरपालिकेला ३१ वेळा नोटीसा जारी केलेल्या आहेत. या शिवाय स्थानिक न्यायालयामध्ये इलचकरंजी नगरपालिका व त्यांच्या मुख्याधिकारी यांच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे. .

४. **<u>जिल्हा परिषद</u> -**

पंचगंगा नदी खो-यामध्ये एकूण १७४ ग्रामपंचायती वसलेल्या असून या ग्रामपंचायती हददीतून सध्या एकूण २३ एमएलडी सांडपाण्याची निर्मीती होते. सध्या हे सांडपाणी प्रक्रियेविना विविध ठिकाणाहून पंचगंगा नदीत मिसळते. १७४ ग्रामपंचायतीमधून निर्माण होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया यंत्रणा उभारण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची असल्यामुळे मंडळाने जिल्हा परिषदेकडे याबाबतीत अनेकवेळा पत्रव्यवहार केलेला असून या संदर्भात शासनाच्या पर्यावरण सचिवांनीही बैठक बोलावून सांडपाण्यावर प्रक्रिया यंत्रणा उभारण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास सूचित केलेले होते.

मंडळाने जिल्हा परिषदेकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्याच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने विविध ग्रामपंचायतींनी सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारण्यासाठी सुकाणु समितीचे गठण केले आहे. सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणाची उभारणी करण्याकरिता सर्वेक्षण करण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत वालचंद कॉलेज ऑप इंजिनीअरींग, सांगली यांना सर्वेक्षण करण्यासाठी नेमणूक केलेली आहे.

## ५. <u>साखर कारखाने</u> -

पंचगंगा नदीच्या उगमापासून कोल्हापूर शहरापर्यंत नदीच्या काठी ७ साखर कारखाने व ५ आसवणी उद्योग वसलेले आहेत. या साखर कारखान्यांनी त्यांच्या कारखान्यातून निर्माण होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्राथमिक व दुयम स्वरूपाची सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा बसविलेल्या आहेत. प्रक्रिया केल्यानंतरचे सांडपाणी कारखान्याकडून त्यांच्या शेतीसाठी वापरणे बंधनकारक केले आहे. तसेच आसवणी प्रकल्पामधून निघणा-या सांडपाण्यावर प्राथमिक स्वरुपाची प्रक्रिया केल्यानंतर त्यापासून सेंद्रीय खत निर्मीती केली जाते.

तसेच आसवणीमधून तयार झालेल्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा वापर सेंद्रीय खत निर्मीतीसाठी केले जातो व आसवणीला कुठल्याही परिस्थितीत सांडपाणी बाहेर न सोडण्यास बंधनकारक केले आहे (zero discharge).

| अ.क्र. | साखर कारखाना / आसवणीचे नाव | फौजदारी दावे |
|---|---|---|
| | **<u>साखर कारखाने</u> -** | |
| १ | मे. डॉ. डी. वाय पाटील सहकारी साखर कारखाना लिमीटेड | १६०/२००४ |
| २ | मे. भोगावती सहकारी साखर कारखाना लिमिटेड | ७३४२/१९९७ |
| ३ | मे. दत्त सहकारी साखर कारखाना लिमीटेड, आसुर्ले-पोर्ले | २७३/१९९७ |
| | **<u>आसवण्या</u> -** | |
| १ | मे. भोगावती सहकारी साखर कारखाना लिमिटेड (आसवणी) | १८/१९९८ |

मंडळाच्या अधिका-याकडून साखर कारखाने तसेच आसवण्यांना वेळोवेळी भेटी देवून सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणेची पाहणी केली जाते. भेटी दरम्यान एखादा साखर कारखाना किंवा आसवण्या दोषी आढळल्यास मंडळाकडून जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ अंतर्गत कारणे दाखवा नोटीसा बजावणे, कलम ३३ अ अन्वये प्रस्तावित आदेश देणे, बंदचे आदेश जारी करणे, न्यायालयामध्ये फौजदारी खटले दाखल करणे, अशा प्रकारच्या कायदेशीर कारवाया केल्या जातात याशिवाय मंडळाने वर नमूद केलेल्या साखर कारखाने व आसविण्याविरोधात न्यायालयात खालिलप्रमाणे फौजदारी खटले दाखल केलेले आहेत.

मंडळाने दोषी आढळलेल्या साखर कारखाने व आसवण्या यांच्या विरोधात न्यायालयात फौजदारी खटले दाखल केलेले असून ते न्यायप्रविष्ठ आहेत. या शिवाय महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून पंचगंगा नदी प्रदूषणास कारणीभूत असलेल्या मे. भोगावती सहकारी साखर कारखाना लि. ही आसवणी दि. ०५.०४.२००६ पासून बंद केलेली आहे.

६. **औद्योगिक वसाहती** -

पंचगंगा नदीच्या खो-यामध्ये एकूण ६ औद्योगिक वसाहती आहेत. या औद्योगिक वसाहतीमधील बहुतेक सर्व उद्योगानी औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी स्वतःची सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारलेली असून प्रक्रिया नंतरचे सांडपाणी बागबगीच्या व शेतीसाठी वापरले जाते. तथापी, कोल्हापूर व इचलकरंजी शहरामध्ये काही उद्योग हे ३०-४० वर्षापेक्षा जास्त जुने असल्याने त्यांच्याकडे औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केल्यानंतर ते सांडपाणी जिरविण्यासाठी / झांडाकरीता वापरण्याकरीता पुरेशी जमीन उपलब्ध - नसल्यामुळे पंचगंगा नदीत मिसळते. तथापि इचलकरंजी औद्योगिक वसाहती मधुन निघणा-या सांडपाण्यावर एकत्रित प्रक्रिया करण्यासाठी सामुहिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारण्याचे काम जवळ जवळ संपत आलेले आहे.

**अ. शिरोली/गोकुळ शिरगाव औद्योगिक वसाहत** -

शिरोली औद्योगिक वसाहत ही पंचगंगा नदीच्या काठावर वसलेली असून या औद्योगिक वसाहतीमध्ये प्रामुख्याने फौंड्री उद्योग वसलेले आहेत. तसेच गोकुळशिरगावा औद्योगिक वसाहतीमध्येही फौंड्री उद्योग वसलेले आहेत. सदरील फौंड्री उद्योगामधून औद्योगिक सांडपाणी बाहेर पडत नसले तरी घरगुती सांडपाणी न्िार्माण होते. या सांडपाण्यावर प्रक्रिया केल्यानंतर ते बागबगीचा व शेतीसाठी वापरणे आवश्यक आहे. तथापी, अनेकवेळा हे सांडपाणी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सेप्टीक टँक/शोष खडडा अशा प्रकारच्या प्राथमिक स्वरुपाच्या प्रक्रिये नंतर नदीत मिसळत असल्याचे दिसून येते. यासंदर्भात मंडळाने एमआयडीसी, उद्योजक व आंदोलक यांच्याशी चर्चा करुन सांडपाण्यावर सामुहिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारण्यासाठी आराखडा तयार करण्याचे ठरलेले आहे. या संदर्भात एमआयडीसी कडे मंडळाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

**ब. लक्ष्मी औद्योगिक वसाहत** -

या औद्योगिक वसाहतीमध्ये प्रामुख्याने टेक्सटाईल प्रोसेसिंग व फौंड्री उद्योग वसलेले आहेत. या वसाहतीतील औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी उद्योगांनी स्वतःची सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा

उभारलेल्या आहेत.  तथापी, सर्व छोटयामोठया उद्योगामधून निर्माण होणा-या सांडपाण्यावर एकत्रित प्रक्रिया करण्याच्या उददेशाने याठिकाणी सामुहिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारण्याचे काम सुरू आहे.  यासाठी मंडळाने एकूण खर्चाच्या २० टक्के अनुदान मंजूर केलेले आहे.  या प्रकल्पाचे जवळजवळ ६० ते ७० टक्के काम झालेले असून नजीकच्या काळात हा प्रकल्प कार्यान्वीत होणे अपेक्षीत आहे.

**क.    <u>पार्वती औद्योगिक वसाहत</u> -**

या औद्योगिक वसाहतीमध्ये प्रामुख्याने टेक्सटाईल प्रोसेस व यंत्रमाग हे उद्योग वसलेले आहेत.  या वसाहतीमधनू निघणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रत्येक उद्योगाची संयंत्रणा आहे.  तथापी, छोटया उद्योगांना औद्योगिक सांडपाण्यावर संपूर्ण प्रक्रिया करणे शक्य होत नसल्यामुळे या ठिकाणी सामुहिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारण्याचे प्रस्तावित आहे.  मंडळाने एकूण खर्चाच्या २० टक्के अनुदान मंजूर केलेले आहे.

**ड.    <u>इचलकरंजी औद्योगिक वसाहत</u> -**

इचलकरंजी शहरात प्रामुख्याने टेक्सटाईल प्रोसेसिंग उद्योग वसलेले असून या वसाहतीमधील उद्योगानी स्वतःची सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारलेल्या आहेत.  तथापी, या छोटया उद्योगाकडून औद्योगिक सांडपाण्यावर प्राथमिक स्वरुपाची प्रक्रिया करण्यात येते. पूढील प्रक्रिया करण्यासाठी सामुहिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारण्याचे काम प्रगती पथावर आहे.  यासाठी मंडळाने एकूण खर्चाच्या २० टक्के अनुदान दिलेले आहे.  हा प्रकल्प नजीकच्या काळात सुरू होणे अपेक्षीत आहे. सदरील वसाहत ही इचलकरंजी शहरात वसलेली असल्यामुळे तसेच या उद्योगांच्याकडे पुरेशी जमीन उपलब्ध नसल्यामुळे सद्यस्थितीत घरगुती सांडपाण्यामध्ये औद्योगिक सांडपाणी मिक्स होवून नदीत मिसळते.

**इ.    <u>कागल-हातकणंगले पंचतारांकीत औद्योगीक वसाहत</u> -**

या औद्योगीक वसाहतीमध्ये प्रामुख्याने टेक्सटाईल प्रोसेसिंग, फौंड्री आणि इंजिनिअरींग उद्योग वसलेले आहेत. या उद्योगातून निर्माण होणा-या औद्योगीक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रत्येक उद्योगाने स्वतःची औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारलेली आहे.  पुढील प्रक्रिया करण्यासाठी सामुहिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारुन ती कार्यान्वीत करण्यात आली आहे.

**२. कावीळ, गॅस्ट्रो, टायफाईड, कॉलरा वगैरे सारख्या जलजन्य रोगांची साथ निर्माण होत आहे.**

आरोग्य अधिकारी, कोल्हापूर यांच्या अहवालानुसार पंचगंगा नदीच्या खालील बाजूस असणा-या करवीर, शिरोळ या तालुक्यातील कोणत्याही गावात गेल्या एका वर्षात गॅस्ट्रोच्या साथीचा उद्रेक झालेला नाही. परंतु रुकडी, ता. हातकणंगले येथे मार्च २०१० मध्ये काविळीची साथ होवून ७० रुग्णांना लागन झालेली होती. तथापि सर्व रुग्णांवर औषधोपचार वेळेवर करुन सर्व रुग्ण बरे झाले व साथ आटोक्यात आली. मृत्यू झालेला नाही.

**३. पाच हजार मच्छीमारांचा उदर निर्वाहाचा प्रश्न निर्माण होवून सुमारे ७०० हेक्टर जमीन क्षारयुक्त झाली आहे.**

पंचगंगा खो-यातील नदी पात्रात मुख्यत्वे करुन पारंपारिक पध्दतीने मत्सव्यवसाय केला जातो. नदीतील प्रदूषणाच्या पातळीत वाढ झाल्याने कांही वेळा मासे मरतुकीच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे माशाचा उत्पादनावर परिणाम झाल्या बाबतच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत.

याबाबत कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्या अहवालानुसार जिल्हयातील शेतक-यांचा सिंचनासाठी पाण्याचा अमर्याद वापर तसेच रासायनिक खतांचा असमतोल वापर व जमिनीतील क्षारांचा निचरा योग्य त-हेने होणेसाठी पुरेशी व्यवस्था नसणे (उदा. चर, पाणंदी इ.) या बाबीमुळे जिल्हयातील जमीन क्षारयुक्त होत आहे. तथापि पंचगंगा प्रदूषणास जबाबदार असणा-या इतर अनेक घटकांचा विचार करता जिल्हयातील जमिनींच्या क्षारतेमुळे होणारे नदी प्रदूषणाचे प्रमाण फारच नगण्य आहे असे नमूद केले आहे.

**४. नदीचा नैसर्गीक प्रवाह बंधा-यामुळे खंडीत होवून प्रदूषणामुळे नदी ही सद्या विष वाहिनी बनली आहे.**

पंचगंगा नदी व तीच्या उपनद्या यावर एकूण ६४ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे आहेत. तसेच पावसाळया व्यतिरिक्त पंचगंगा नदीमध्ये वरील बाजूस असणा-या धरणातून ठरावीक वेळेला पाणी सोडले जाते व बंधा-यातील पाण्याची पातळी ठराविक झाल्यानंतर तो प्रवाह बंद केला जातो. सदरील बंधा-यांच्या मध्ये नदीचा प्रवाह बंद झाल्यानंतर नदी काठावरील महानगरपालिका, नगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत घरगुती सांडपाणी विनाप्रक्रिया नदीत मिसळते तसेच अपघातामुळे विविध उद्योगांचे प्रक्रिया करुन किंवा प्रक्रियेविना सांडपाणी नदीत मिसळून नदीचे प्रदूषण होते. स्थानिक पातळीवर नदीवरील धरणातून कालव्याने पाणी देण्याच्या पध्दतीचा वापर न करता कोल्हापूर पध्दतीचे बंधारे नदी पात्रात बांधण्याची आणि पाणी वापरण्याची पध्दत आहे. सदरचे पाणी किमान ९ दिवस बंधा-यात अडवलेले असते व त्या दरम्यान दोन बंधा-यांच्या दरम्यान दुषित पाणी मिसळल्यामुळे बंधा-यातील पाणी साठयाच्या प्रदूषणाची तिव्रता वाढते. असे पाणी बंधा-यानंतर खाली सोडण्यास काही ग्रामपंचायतींचा विरोध होतो.

**५.	नदीचे पात्र गाळामुळे उथळ झाल्याने पुराचा धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाल्याने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही.**

पंचगंगा नदी पात्रात बालींगा गावापासून कृष्णा नदीत मिसळेपर्यंत एकूण ८ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे आहेत. या बंधा-यावर सदरचे पाणी बरगे वापरुन अडवले जाते. पंचगंगा नदीच्या वरील भागाकडून जमिनीच्या धूपीमुळे गाळ निर्माण होतो तसेच कोल्हापूर शहर व नदीच्या काठावरील स्थानिक स्वराज्य संस्था यातून निर्माण होणा-या घरगुती सांडपाण्याबरोबर मिसळणारा गाळ नदीच्या पात्रात मिसळतो. सदरचा गाळ हा नदीपात्रात असणा-या बंधा-यामध्ये साचला जातो. त्यामुळे नदी पात्राची खोली कमी होवून पूर सदृश्य परिस्थीती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापि, सदरचा गाळामुळे पुराचा धोका निर्माण होवू नये म्हणून संबंधित विभागाने योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे.

पंचगंगा नदीच्या प्रदूषणास आळा घालण्यासाठी खालिलप्रमाणे उपाययोजना केल्यास ब-याच अंशी नदीचे प्रदूषण कमी होण्यास मदत होईल असे वाटते.

१. कोल्हापूर शहरामध्ये ३० वर्षापूर्वीची भूयारी गटर योजनेऐवजी संपूर्ण शहरासाठी वाजवी क्षमतेची नवीन भुयारी गटार योजना टाकणे आवश्यक वाटते.

२. जयंती व दुधाळी नाल्यासाठी तसेच इतर नाल्यामधून वाहणारे घरगुती सांडपाणी एकत्रीत करुन सदरील सांडपाण्यावर योग्य ती प्रक्रिया करणारी संयंत्रणा बसवणे गरजेचे वाटते. तसेच नदीच्या काठावर वसलेल्या ग्रामपंचातीच्या हददीतून निर्माण होणा-या घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करुन शेतीसाठी वापरणे आवश्यक वाटते.

३. नदीच्या पाण्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी नदीमधील बंधा-यातून गाळ काढणे तसेच नदी प्रवाहीत ठेवणे गरजेचे वाटते.

४. कोल्हापूर महानगरपालिकेच्या हददीतून तयार होणा-या नागरी घनकच-याची विल्हेवाट शास्त्रोक्त पध्दतीने लावण्यासाठी मे. झूम बायोफर्टीलायझर प्रा. लि. व्यतिरिक्त दुस-या ठिकाणी योग्य त्या क्षमतेचा घनकच-यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प व भूभरण प्रकल्प हा नागरी घनकचरा नियमानुसार उभारणे गरजेचे वाटते.

५. शासनाच्या खालील सर्व संबधित विभागांनी करावयाची कार्यवाही -

| अ.क्र | शासकीय विभाग | संलग्न कामे |
|---|---|---|
| ०१ | जलसंधारण / जलसंपदा विभाग | नदीचा प्रवाह व त्याचे पाणलोट क्षेत्राचे व्यवस्थापन,न्युनतम प्रवाह राखणे |
| ०२ | नागरी विकास विभाग | सांडपाणी एकत्रीकरण, शुध्दीकरण व विल्हेवाट तसेच घनकचरा व जैववैद्यकिय कचरा व्यवस्थापन यासाठी नगरपालिका / महापालिका अर्थसंकल्पकीय तरतूद व |

| | | |
|---|---|---|
| | | त्याचे संबंधित नगरपालिकेला वितरण |
| ०३ | जिल्हापरिषद | सांडपाणी एकत्रीकरण, शुध्दीकरण व विल्हेवाट तसेच घनकचरा व्यवस्थापनयासाठी ग्रामपंचायत / ग्रुप ग्रामपंचायत यांना अर्थसंकल्पकीय तरतूद व त्याचे संबंधित ग्रामपंचायतीला वितरण |
| ०४ | कृषी विभाग | पीक पध्दती तसेच किटकनाशके व खतांचा योग्य वापर |
| ०५ | उद्योग विभाग | उद्योगांच्या विकासाकरीता पर्यावरण पोषक सामाईक पायाभूत सुविधां निर्माण करणे |
| ०६ | महानगर पालिका / नगर पालिका | घरगुती सांडपाणी प्रकिया यंत्रणा, नागरी घनकचरा, जैविक घातक कचरा यांच्या शास्त्रीय व्यवस्थापनासाठी सुविधा निर्माण करणे. |
| ०७ | जिल्हा प्रशासन | समन्वय व योजनाबध्द कार्यक्र म राबविणे, जमीन वापराबाबत धोरण राबविणे |
| ०८ | अशासकीय संस्था / शैक्षणिक संस्था | तांत्रिक व वैज्ञानिक सल्ला देणे तसेच तसेच जनजागृती करणे. |